# द.भै.फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर

## (वरिष्ठ महाविद्यालयीन विभाग)

## **'दयानंद' वार्षिक अंक २०१८-१९**

**दि. १९/०१/२०१९**

द.भै.फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयातील वरिष्ठ विभागामध्ये शिकणाऱ्या सर्व विदयार्थ्यांना सूचित करण्यात येते की, 'दयानंद' वार्षिक अंकासाठी लेख मागविण्यात येत आहेत. **कथा, कविता, एकांकिका, ललित लेख निबंध, व्यक्तिचित्रे, मुलाखत, माहितीपर लेख, वैचारिक लेख, अर्थविषयक लेख, प्रवास वर्णन, रेखाचित्र, छायाचित्र, सामाजिक शास्त्रावर आधारीत पर्यावरण, वेगवेगळया सामाजिक व पर्यावरण विषयक समस्या आणि आत्मकथनपर लेखन** प्रकारातून लेख लिहावेत.

सर्वच प्रकारचे लेख स्वलिखित असावेत. विद्यार्थ्यांना स्वतःच लिहिल्याचे प्रतिज्ञापत्र भरून द्यावयाचे आहे. लेख **मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, कन्नड व उर्दू या भाषांतून** लिहिता येतील. उत्कृष्ट लेखांना सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विद्यापीठ नियतकालिकांच्या 'सृजनरंग' स्पर्धेत वैयक्तिक लेखांना प्रथम, व्दितीय, तृतीय अशी पारितोषिके मिळतील आणि जास्तीत जास्त पारितोषिके मिळणाऱ्या वार्षिक अंकास प्रथम, व्दितीय, तृतीय अशी पारिताषिके मिळतील. शै. वर्ष २०१६-१७ च्या स्पर्धेत आपल्या 'दयानंद' वार्षिक अंकास तृतीय पुरस्कार (वैयक्तिक पुरस्कार-१५) तर शै. वर्ष २०१७-१८ च्या वार्षिक अंकास व्दितीय क्रमांक (वैयक्तिक पुरस्कार-२५) प्राप्त झाले आहेत.

**वैयक्तिक पुरस्काराचे स्वरूपः-**

अ) प्रथम पुरस्कार - रू. ५०० व प्रमाणपत्र
ब) व्दितीय पुरस्कार- रू. ३०० व प्रमाणपत्र
क) तृतीय पुरस्कार- रू. २०० व प्रमाणपत्र
ड) उत्तेजनार्थ पुरस्कार रू. १०० व प्रमाणपत्र

महाविद्यालयाच्या वार्षिक अंकास शै.वर्ष २०१८- १९ च्या स्पर्धेत वरचा क्रमांक मिळविण्याच्या दृष्टीने आपले लेखन सर्वोत्तम करण्याचा प्रयत्न करावा. कागदाच्या एकाच बाजूला लिहून पुन्हा-पुन्हा वाचून आपल्या विभागातील शिक्षकांना दाखवून त्यात सुधारणा करून दि. १५/०२/२०१९ पर्यंत संपादक मंडळाकडे लेख सादर करावेत. अधिक माहितीसाठी संपर्कः डॉ. राजशेखर शिंदे - मराठी विभागप्रमुख - ७५८८३७३७१०

डॉ. गंगाधर बिराजदार- हिंदी विभागप्रमुख - ९९२१९९९९४९

प्राचार्य

\\admission\My Documents\WIDE.docx.doc

Scanned by CamScanner